2021-22



RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*November Special Issue - IV 2021*

Editorial Officer

**Kranti Publication**

Georai Dist.Beed

Beed -431 127

Contact : 7875827115

**E-mail :** Sarkatelata@gmail.com

**Published By :**

Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad & Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha.
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

# Guidelines for Writers

- "Power of Knowledge" the referred research journal has permission and registered of RNI, Ministry of Information and Broadcasting, Govt, of India.

  Research papers in all subjects of all faculties in Hindi, English, Marathi will be published in "Power of Knowledge".

- Research scholars should sent their papers in Marathi, Hindi and English on one side typed papers. It should be in Pagemaker or word format with a CD. Scholars should send their papers through registered / speed post. A Xerox copy of papers should be enclosed.

- The writer should give a letter of undertaking that he / she has not violated copy right act and the whole responsibility will not be liable of any legal action. This undertaking is compulsory with the research paper.

- Directions regarding fonts

  English **Times New Roman or any 12** font

  Hindi & Marathi **ISM DVB TT- Surekh Pagemaker, Font 14**

- Research paper should be in A-4 size upto 4-5 pages, value language and references should be mentioned.

- There should not be grammatical mistakes.

- If the research paper published in "Power of Knowledge" not accepted by Research Recognition Committee/University Body/other research related committees, the Editor/Printer/Publisher will not take any responsibility of the same.

- All the postal contact should be to the address of editor through registered post only.

- Despute shall be subject to hearing at Hon'ble BEED (M.S.) Jurisdiction only.

Ideas expressed in "Power of Knowledge" belongs to the writer exclusively. The editor, publisher & printer of "Power of Knowledge" have nothing to do it with them. At the same time it is made clear that if writers violate copyright act, they will be responsible for their own action. Hence, it is clarified from editor, publisher and printer's side.

आ.व्या.शिक्षण संस्थेचे ... महाविद्यालय



## Index (अनुक्रमणिका)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Financial Literacyand Digital Payment System In India | Dr. MaindBalasahebVaijanath | 1-7 |
| 2 | Impact of Globalization on English Language | Dr. Subhash S. Waghmare | 8-12 |
| 3 | A Great Never Give Up Personality Artist P.N.Choyal | Jyoti Singh | 13-17 |
| 4 | Public Libraries of Tarakeswar Block in the Hooghly District of West Bengal: Present-day Scenario | Bikash Kumar Halder<br>Bibhash Ram Singha | 18-24 |
| 5 | Geographical study of green agriculture | Dr.Ghodke.J.V. | 25-27 |
| 6 | Need to Know Malnutrition | Dr. Manisha Pandurang Wanjari | 28-31 |
| 7 | Adolescent Reproductive and Sexual Health (ARSH) services in Gadchiroli- A rapid analysis | Mayank Mohan Mishra | 32-35 |
| 8 | A Study Of The Impact Of Digital Marketing In Sustaibale Development Of India | Mrs. Prof. Pratibha Dattatrya Pudale | 36-40 |
| 9 | Imperical Study Of Relationship Between Occupation Stress And Emotional Intelligence During Covid -19 | Dr. Anita Manna<br>Bipinchandra S. Wadekar. | 41-46 |
| 10 | Transfer: Effective Tool For Accountable Administration | Dr. More Navanath Bhagawan | 47-51 |
| 11 | मराठी साहित्यातील गझलेचा उगम व स्वरुप | शीतल अण्णासाहेब सुसरे | 52-55 |
| 12 | भारतीय महिलांवरील अत्याचार - एक सामाजिक चिंतन | प्रा.कोने दिलीप महादू | 56-61 |
| 13 | रानवाटा' कविता संग्रहातील आदिवासींच्या प्रश्नांचे दर्शन | डॉ.किशोर नथू सोनवणे<br>डॉ.मधुचंद्र लक्ष्मण भुसारे | 62-67 |
| 14 | गुरुसंस्था : प्राचीन व मध्ययुगीन संदर्भ | प्रा.डॉ.दत्तात्रय प्र. डुंबरे | 68-74 |
| 15 | महात्मा फुले आणि भारतीय शिक्षण | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 75-80 |
| 16 | चरित्र - आत्मचरित्र : स्वरुप व संकल्पना | प्रा.डॉ.राहुल हांडे<br>श्री.रविंद्र मधुकर चव्हाण | 81-84 |
| 17 | मुस्लीम लेखिकांच्या आत्मचरित्रातुन आलेले भाषाविशेष | प्रा.डॉ.केतकी प्र.भोसले | 85-88 |
| 18 | फकिरा : आशय आणि अभिव्यक्ती | डॉ.राजेश्वर मा. दुडुकनाळे | 89-92 |
| 19 | शाहीर साहेबराव येरेकराच्या शाहिरीतून प्रकटणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयीची कृतज्ञता | चारुमती नारायण भदरगे | 93-97 |
| 20 | डॉ. जयंत नारळीकरांचे विज्ञान साहित्यातील योगदान | डॉ. दिलीप पवार<br>डॉ. संजय शिंदे | 98-102 |



202

# महात्मा फुले आणि भारतीय शिक्षण

**डॉ.राजेश्वर दुडूकनाळे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर जि.नांदेड

आधुनिक काळातील भारतीय शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीचे प्रवर्तक म्हणून महात्मा जोतीराव फुले ओळखले जातात. सामाजिक परिवर्तनाचे, क्रांतीचे आणि प्रगतीचे महत्त्वाचे सधन म्हणून ते शिक्षणाकडे पाहतात. भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशात बहुसंख्य लोकांच्या शिक्षणाला, ज्ञानार्जनाला धर्माने बंदी होती. वेद वाचणे, ऐकणे किंवा त्यावर भाष्य करणे हा बहुसंख्य लोकांसाठी गुन्हा ठरविण्यात आला होता. शोषक वर्गाकडून शोषितांचे ज्ञानार्जनाचे हक्क नाकारण्यात आले होते. यामुळे 'भारत देशातील मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित राहिला. म्हणूनच फुल्यांनी '...एवढे सारे अनर्थ एका अविद्येने केले' असे म्हटले होते. ही अज्ञानाची, अविद्येची कोंडी फोडण्याचे महान कार्य महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केले.

**धर्म आणि शिक्षण:**

अतिप्राचीन कालपासूनच धर्माचा मानवी जीवनावर मोठा प्रभाव राहिलेला आहे. माणूस आदिम अवस्थेमध्ये असताना नैसर्गिक संकटांना घाबरत असे. यातून बाहेर पडण्यासाठी आदिम काळातील माणसाने 'धर्म' नावाच्या संकल्पनेला जन्म दिला. अर्थातच, धर्म या संकल्पनेचा जन्म माणसाला निर्भय बनविण्यासाठी झाला होता. सुरुवातीच्या काळात धर्म हा माणसासाठी होता. माणूस धर्मासाठी नव्हता. नंतरच्या काळात मात्र हे समीकरण बदलले. धर्माचे भांडवल करून लोकांचे शोषण करता येते, हे धर्मपंडितांनी हेरले. भारतात वैदिकांनी लोकांना अज्ञानात ठेवण्यासाठी धर्माचा हत्यार म्हणून वापर केला. वेद आणि मनुस्मृतीच्या आधारे शूद्रातिशूद्र, महिला वर्गाला शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. परिणामी बहुसंख्य समाज ज्ञानापासून दूर राहिला. धर्माने माणूस ज्ञानी बनून उन्नत होण्याऐवजी धर्मशास्त्राचा गुलाम बनून अज्ञानी राहिला.

**एकोणिसावे शतक आणि भारतीय शिक्षण :**

एकोणिसावे शतक भारताच्या इतिहासात प्रबोधनाचे, जागृतीचे शतक म्हणून ओळखले जाते. १८१८ साली पेशवाईचा राजकीय अस्त झाला होता. परिणामी इंग्रजी साम्राज्यामुळे भारतीय समाज अनेक अंगांनी प्रभावित होऊ लागला. इंग्रजी साम्राज्याचे अनुषंगिक परिणाम म्हणून म्हणा किंवा इंग्रजी साम्राज्याची गरज म्हणून म्हणा भारतात त्यांनी शिक्षणाचे सार्वत्रीकरण केले. इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेली एक पिढी भारतीय समाजाचा नव्याने विचार करू लागली. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर आदी समाजसुधारकांनी या शतकात समाजजागृतीचे कार्य हाती घेतले. महात्मा फुले यांनी क्रांतिकारी समाजसुधारक म्हणून या एकोणिसाव्या शतकावर आपली नाममुद्रा उमटवली आहे. फुले हे मानवी जीवनाचा वस्तुनिष्ठ, मूलगामी विचार करणारे तत्त्वचिंतक आहेत. छत्रपती शिवरायांच्या इतिहासातून प्रेरणा घेऊन आणि थॉमस पेनच्या 'राईट्स ऑफ मॅन' या ग्रंथाने प्रभावित होऊन त्यांनी आपल्या समाजकार्याला सुरुवात केली. सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारले. मानवी स्वातंत्र्याचा जयघोष केला.

अ.व्या.शिक्षण संस्थेचे



**महात्मा फुल्यांचे शिक्षण :**

महात्मा फुलेंचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. त्यांच्या पूर्वजांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील, पुरंदर तालुक्यातील 'खानवली' हे होते. 'माळी' या धर्माने शूद्र मानल्या गेलेल्या जातीमध्ये त्यांचा जन्म झालेला. त्यामुळे फुले घराण्याला शिक्षणाची कोणतीही परंपरा नव्हती. गोविंदराव फुल्यांनी ज्योतीरावांना वयाच्या सातव्या वर्षी शाळेत टाकले. फुल्यांचे शाळेतील प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या दुकानातील ब्राह्मण कारकुनाच्या सांगण्यावरून गोविंदरावांनी फुलेंचे शिक्षण बंद केले. बालपणापासूनच ज्योतीरावांना ज्ञानार्जनात रुची होती. शिक्षण बंद केल्यामुळे ते अस्वस्थ झाले. पुढे वयाच्या चौदाव्या वर्षी गफवार बेग मुन्शी यांनी फुल्यांना पुन्हा शाळेत टाकण्याची विनंती गोविंदरावांना केली.त्यामुळे परत थांबलेले शिक्षण सुरू झाले. १८४७ साली फुल्यांनी इंग्रजी शाळेतील अभ्यास पूर्ण केला.

शिक्षणामुळे महात्मा फुलेंच्या मनामध्ये समाजाच्या विकासाची प्रगल्भ जाणीव निर्माण झाली. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांच्या लक्षात आले. इंग्रजी शिक्षणामुळे एका नव्या जगाची ओळखही त्यांना झाली. त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा सर्वांत मोठा परिणाम म्हणजे त्यांची बुद्धी चिकित्सक बनली. समाजातील किंवा धर्मातील कोणत्याही गोष्टीची विवेकाच्या आधारे चिकित्सा केल्याशिवाय ती स्वीकारायची नाही, हे तत्त्व त्यांनी अंगिकारले. शिक्षणाचा, शिक्षणातील तत्त्वांचा संबंध हा मानवी वर्तनाशी आणि सामाजिक पर्यावरणाशी आहे, याची जाणीव आधुनिक काळात प्रथम फुल्यांनी करून दिली. ज्ञान आणि कृती याचे अतूट नाते त्यांनी स्वतःच्या वर्तनातून अधोरेखित केले. समाजाला सशक्त, शोषणमुक्त आणि विवेकी बनवायचे असेल तर शिक्षणातून विचारांची पेरणी करणे आवश्यक आहे, हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी सामाजिक कार्याची सुरुवात शिक्षणापासूनच केली.

**सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती :**

महात्मा फुले यांच्या काळातील सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. १८१८ला पेशवाईचा राजकीय अस्त झाला होता. पेशवाईने वैदिक धर्मव्यवस्था मजबूत करण्याचे काम केले. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, महिला, वैदिक धर्मव्यवस्थेने घोषित केलेले शूद्रातिशूद्र अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेले होते. तत्कालीन समाजव्यवस्थेत ब्राह्मण पुरुष वगळता समाजातील इतर कोणत्याही घटकाला शिक्षण घेण्याचा, ज्ञान संपादन करण्याचा अधिकार नव्हता. तथाकथित धर्मशास्त्रानुसार अध्ययनाचा आणि मार्गदर्शन करण्याचा अधिकार पुरोहीत वर्गाकडे होता. परिणामी बहुसंख्य समाज ज्ञानापासून वंचित राहिला. धार्मिक आणि जातीय द्वेषाने समाजाला ग्रासलेले होते. शूद्र, अस्पृश्य आणि महिला वर्गाला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा नैसर्गिक हक्कच नाकारण्यात आलेला होता. अर्थातच, या शोषित वर्गाच्या शैक्षणिक, सामाजिक मागासलेपणाची कारणं पुरोहितांच्या धर्मशास्त्रामध्ये आहेत, याची जाणीव फुल्यांना झाली. धर्म, वर्ण आणि जातीमध्ये समाज विभागलेला असल्यामुळे अशा समाजाला गुलामीची जाणीव करून देणे, त्यांच्यामध्ये सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करणे मोठे कठीण काम होते. फुल्यांनी हे आव्हान स्वीकारले. स्त्रियांना शिक्षण देणे हा धर्माने गुन्हा असताना स्वतःच्या पत्नीला शिक्षित करून, अध्यापनाची जबाबदारी देऊन अत्यंत निष्ठेने त्यांनी समाजप्रबोधनाच्या कार्यास प्रारंभ केला. अत्यंत आव्हानात्मक आणि चांगल्या कामाची सुरुवात स्वतःपासून करून फुल्यांनी फार मोठा आदर्श भारतीय समाजासमोर उभा केला आहे.

**...इतके अनर्थ एका 'अविद्ये'ने केले :**

आधुनिक काळात बहुजन समाजाला ज्ञानाचे महत्त्व प्रथम फुल्यांनी पटवून दिले. सर्वप्रकारच्या शोषणातून मुक्त होण्यासाठी अगोदर प्रत्येकाने शिकलेच पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला. शिक्षणामुळे इंग्रजांची झालेली प्रगती त्यांनी अनुभवली होती. विद्येमुळेच माणसाला शहाणपण येते, यावर त्यांचा विश्वास होता. अशा ज्ञानाचे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना ते म्हणतात,

**"विद्येविना मती गेली, मतिविना नीती गेली,**
**नितीविना गती गेली, गतिविना वित्त गेले,**
**वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."**

महात्मा फुले खऱ्या अर्थाने समाजशास्त्रज्ञ होते. त्यांनी समाजाच्या अधोगतीची मीमांसा केली. मागासलेपणाची कारणं शोधून काढली. विद्येचे महत्त्व सांगणारा वरील अखंड खूप प्रसिद्ध आहे. या तीन काव्यमय ओळी म्हणजे शोषितांच्या वेदनेचा अभंगच होय. शूद्रांच्या अवस्थेचे अत्यंत वास्तवदर्शी, मार्मिक असे वर्णन यातून आले आहे. विद्येमुळे मती, नीती, गती आणि वित्त येते हे अत्यंत मार्मिक शब्दात फुल्यांनी सांगितले आहे. 'मती' या शब्दातून ज्ञानार्जनामुळे विवेकी बुद्धिमत्ता अंगी यावी, हे अपेक्षित आहे. 'नीती' म्हणजे मानवी जीवनमूल्यांच्या अंगाने व्यक्ती आणि समाज अधिकाधिक उन्नत होत जावा, हे अपेक्षित आहे. अशा 'मती' आणि 'नीती' अंगिकारलेल्या समाजाने 'गती' म्हणजे प्रगतीचा मार्ग धारण करावा. अर्थातच, मती, नीती, गती आली की वित्ताचा प्रश्न सुटतो, अविद्येचा नायनाट होऊन परिणामी व्यक्तीचे सामाजिक आणि आर्थिक मागासलेपण जाते, असा या अखंडाचा अन्वयार्थ आहे.

**शूद्रातिशूद्रांसाठी शाळांची निर्मिती :**

वयाच्या एकविसाव्या वर्षी अज्ञानाला 'ज्ञान' हे उत्तर मानून महात्मा फुल्यांनी शूद्रातिशूद्र वर्गासाठी शाळा सुरू करण्याचे अत्यंत क्रांतिकारी कार्य हाती घेतले. मानवाला उन्नत बनविणे, सामाजिक सुधारणा घडवून आणणे हे त्यांच्या या शैक्षणिक कार्याचे ध्येय होते. जानेवारी १८४८ मध्ये पुण्यात पहिली स्वतंत्र मुलींची शाळा महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुलेंनी सुरू केली. ०१ जानेवारी १८४८ ते १५ मार्च १८५२ दरम्यान एकूण १८ शाळा त्यांनी सुरू केल्या. हे क्रांतिकारी काम फुले ज्याकाळात करीत होते तेव्हा महादेव गोविंद रानडे दहा वर्षाचे तर विष्णुशास्त्री चिपळूणकर दोन वर्षाचे होते. धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, पंडिता रमाबाई, महात्मा गांधी यांचा तर जन्मही झालेला नव्हता. मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू करण्याचा हा फुले दांपत्याचा आधुनिक भारताच्या इतिहासातील पहिलाच प्रयत्न होता. त्यांनी जाणीवपूर्वक महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिलेले दिसून येते.

'शाळा' म्हणजे केवळ चार भिंतीची खोली, शिक्षक, फळा आणि खडू हा अर्थ फुल्यांना अपेक्षित नाही. सामाजिक परिवर्तनाचे केंद्र म्हणून ते शाळेकडे पाहतात. मानवी मेंदूचा विकास घडवून आणणे, समाजातील प्रत्येक व्यक्तीला आत्मभान प्राप्त करून देण्याचे कार्य त्यांना शाळेकडून अपेक्षित आहे. समाजपरिवर्तनासाठी ज्ञानाची निर्मिती आणि त्याचा प्रसार घडवून आणण्याचे अत्यंत महत्त्वाचे माध्यम म्हणून ते शाळेकडे पहातात. अर्थातच, फुल्यांच्या सामाजिक क्रांतीच्या, परिवर्तनाच्या लढ्यामध्ये शाळेला, शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

केवळ शाळा काढून फुले थांबले नाहीत. वाचनामुळे माणूस बहुश्रुत होतो, त्याचे मस्तक संपन्न होते याची जाणीव फुल्यांना होती. विद्यार्थ्यांच्या वाचनाची सोय व्हावी, त्यांना अवांतर वाचन करता यावे, सखोल अभ्यास करता यावा म्हणून त्यांनी वाचनालय सुरू करण्याची मोहीम हाती घेतली. त्यामुळे शाळांना जोडून

वाचनालयाची सोय होऊ लागली. त्यामुळे सरकारी शाळांपेक्षा फुले दांपत्यांनी सुरू केलेल्या शाळेतील संख्या वाढत राहिली. ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचनसंस्कृती निर्माण करून तिचे संवर्धन करण्यात फुल्यांचे मोठे योगदान आहे.

**भारतीय स्त्री शिक्षणाचे जनक :**

मनुस्मृती या वैदिकांच्या धर्मग्रंथाने भारतातील महिला वर्गावर अत्यंत कठोर बंधने लादलेली होती. स्त्रीने लहानपणी वडिलांच्या ताब्यात, तरुणपणी पतीच्या ताब्यात आणि म्हातारपणी मुलांच्या ताब्यात राहावे, असा दंडक घालून मनुस्मृतीने महिलावर्गाचे स्वातंत्र्यच नाकारले होते. त्याकाळात शूद्रांपेक्षा अतिशूद्रांची (अस्पृश्य) आणि अतिशूद्रांपेक्षा महिलावर्गाची परिस्थिती वाईट होती. शिक्षणाचा विषय तर खूप लांबचा होता. स्त्रीला भोगवस्तूच्या पलीकडे कोणतेही अस्तित्व नव्हते. पुरुष आणि मुल हेच तिचे कर्तव्य आहे. पती हाच परमेश्वर आहे, असे मानून तिने आपले आयुष्य व्यतीत करायला हवे असाच धर्मशास्त्राचा कायदा होता.

महात्मा फुल्यांनी हा धर्मशास्त्राचा कायदा मोडला. "स्त्री पुरुषांसाठी शाळा त्या घालाव्या ॥ विद्या शिकवाव्या ॥ भेद नाही ॥" असा अखंड रचून स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाचा आग्रह धरला. सावित्रीबाईंना त्यांनी स्वतः शिकविले. खरेतर सावित्रीबाईंनी पाटीवर अक्षर गिरविले म्हणजे प्रचंड अशा काळोखाच्या साम्राज्याला एका स्त्रीने दिलेला धक्का होता. गुलामीच्या अंधकाराला उद्ध्वस्त करणारा हा ज्वालामुखी होता. ज्याकाळात महिलांना घराबाहेर पाऊल ठेवण्याची परवानगी नव्हती, त्याकाळात या महामानवाने आपल्या पत्नीला स्वतः शिक्षित करून शाळेत अध्यापनाची जबाबदारी दिली. नंतर सावित्रीबाईंच्या मदतीला फातिमा शेख आल्या. एक स्त्री धर्माच्या विरोधात जात असल्याचे पाहून सनातन्यांनी मोठा कांगावा केला. सावित्रीबाईंना खूप छळले. शेणा-दगडांचा मारा, अपमान सहन करीत, आलेल्या प्रसंगांचा प्रतिकार करीत अध्यापनाचे कार्य त्यांनी अखंडपणे चालू ठेवले. महात्मा फुल्यांनी स्त्रीशिक्षणाला जाणीवपूर्वक प्राधान्य दिले. महिलांना शिक्षण देऊन त्यांनी सामाजिक गुलामगिरीच्या मुळावरच घाव घातला. म्हणून फुले भारतीय स्त्रीशिक्षणाचे जनक ठरतात.

**शिक्षणासाठी गृहत्याग :**

साधारण अडीच हजार वर्षापूर्वी तथागत गौतम बुद्धांनी ज्ञानप्राप्तीसाठी आणि समाजाला शोषणातून, गुलामीतून मुक्त करण्यासाठी गृहत्याग केला होता. स्वतः ज्ञान प्राप्त करून समाजाला शहाणे करण्याची प्रेरणा या बुद्धांच्या गृहत्यागामागे होती. आधुनिक काळात फुले दांपत्याला लोकांना अज्ञानातून मुक्त करण्यासाठी स्वतःच्या घराचा त्याग करावा लागला.

सतराव्या शतकात अभंग लिहून कीर्तनाच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांना शहाणे करण्याचा प्रयत्न केल्यामुळे संत तुकारामांवर धर्ममार्तंडांनी खटला भरला. त्यांच्या अभंगाची गाथा इंद्रायणीत बुडवली. आधुनिक काळात जेव्हा अखंडांच्या माध्यमातून लोकांना शिक्षित करण्याचा प्रयत्न फुल्यांनी सुरू केला, त्यासाठी शाळा काढल्या तेव्हा पुण्यातील कर्मठ लोकांनी फुल्यांच्या वडिलांचे म्हणजे गोविंदरावांचे कान भरले. पितापुत्रामध्ये संघर्ष निर्माण झाला. जोतीराव फुले धर्म, परंपरा बुडवायला निघालेले आहेत, ते ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करणार आहेत, असा अपप्रचार करण्यात आला. त्यामुळे गोविंदरावांनी फुल्यांच्या समोर दोन पर्याय ठेवले. पहिला पर्याय म्हणजे शिक्षणाचे काम बंद करून आपला परंपरागत व्यवसाय करणे आणि दुसरा पर्याय म्हणजे शिक्षणाचे कार्य सोडायचे नसेल तर घर सोडणे. फुल्यांनी दुसरा पर्याय निवडला. पत्नीसह १८४९साली घराचा त्याग करून आपले समाजकार्य जिद्दीने पुढे चालू ठेवले. बहुजनांच्या, शोषितांच्या शिक्षणासाठी त्यांनी सपत्नीक



२०६

गृहत्याग केला. पहिला पर्याय निवडला असता तर देश एका मोठ्या क्रांतीकारकाला मुकला असता. दुसरा पर्याय म्हणजे बंड! मानवजातीच्या कल्याणासाठी केलेला विद्रोह! व्यवस्थेच्या, शोषणाच्या विरोधात पुकारलेले युद्ध!!

महात्मा फुल्यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली तेव्हा त्यांचे वय एकवीस वर्ष होते. गृहत्याग केला तेव्हा त्यांचे वय बावीस वर्ष होते. खरे तर एकवीस-बावीस वर्ष वय म्हणजे नुकताच तारुण्यातला प्रवेश. इतक्या कमी वयात केवढी मोठी समज! जीवनातील उमेदीचा आणि वैयक्तिक जीवनाबद्दलची स्वप्न पाहण्याचा आणि रंगवण्याचा हा काळ. पतीपत्नी मिळून सुखाने जगण्याची, संसाराची स्वप्न प्रत्यक्षात आणण्याची ही वेळ. परंतु फुल्यांच्या मनामध्ये तर समाजक्रांतीचे स्वप्न फुलत होते. हे स्वप्न खूप मोठे होते. तसा स्वप्नाचा संसारही खूप मोठा होता. हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी दोघे पतीपत्नी वाटेल ती किंमत मोजायला तयार होते. केवढे हे औदार्य! अंतःकरणात माणसाबद्दल प्रचंड कारुण्य, प्रेम असणारा माणूसच असे औदार्य दाखवू शकतो.

**हंटर कमिशन आणि महात्मा फुले :**

भारतातील शिक्षण विषयक समस्या जाणून घेण्यासाठी तत्कालीन सरकारने १८८२ साली सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीला महात्मा फुले यांनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी आपले निवेदन सादर केले. ह्या निवेदनामध्ये त्यांनी भारतातील शिक्षणाच्या मूलभूत समस्यांचा विस्ताराने विचार केला आहे. राष्ट्राच्या, समाजाच्या विकासाचा मूलभूत घटक म्हणून ते शिक्षणाकडे पाहतात. या निवेदनातील काही ठळक मुद्दे इथे विचारात घेतले आहेत.

**१. कनिष्ठ लोकांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष :**

तत्कालीन सरकारने कनिष्ठ लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली असल्याचे या निवेदनात महात्मा फुले यांनी स्पष्ट शब्दात नमूद केले आहे. ते म्हणतात, "सरकार असे सुखस्वप्न बाळगत आहे की, वरिष्ठ वर्गातील लोक हे कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करतील. हे सुखस्वप्न उराशी बाळगून गरीब शेतकऱ्यांकडून सरकार जे सारा गोळा करते, त्या सर्व वसुलाचे उत्पन्न सरकार वरिष्ठ लोकांच्या शिक्षणावर उधळते."[२] भारतातील उच्चवर्णीय, उच्चवर्गीय लोकांना शिक्षण दिले तर कनिष्ठ वर्गापर्यंत ते झिरपत जाईल, असा इंग्रज सरकारचा समज होता. अशा इंग्रजांच्या शिक्षण विषयक धोरणाला महात्मा फुल्यांनी स्पष्ट शब्दात विरोध दर्शविला आहे. शेतकरी वर्गाकडून जो महसूल वसूल केला जातो, तो कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणावर सरकारने खर्च करावा, अशी मागणी या निवेदनात त्यांनी केली आहे.

**२. उच्चवर्गाची मक्तेदारी :**

भारतीय समाजावर नेहमीच मुठभर लोकांचे वर्चस्व राहिले आहे. तत्कालीन शिक्षण क्षेत्रही याला अपवाद नव्हते. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठ्याप्रमाणात ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी होती. "चॅप्लीन नावाच्या इंग्रज आयुक्ताने १८२१ साली काढलेल्या संस्कृत पाठशाळेत ब्राह्मणांनाच प्रवेश दिला जाई. इतरांना त्यात बंदी होती"[३] शिक्षण आणि सरकारी नोकरीच्या क्षेत्रात नेहमीच उच्चवर्गाचे वर्चस्व राहिले आहे. त्यामुळे सरकारी क्षेत्रातील शिक्षण व्यवस्थेमध्ये, नोकऱ्यांमध्ये मागास, शोषित वर्गाला योग्य वाटा मिळाला पाहिजे, अशी मागणी या निवेदनाच्या माध्यमातून फुल्यांनी सरकारकडे केली आहे. पुढे १९०२ साली राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात मागास जातींच्या उन्नतीसाठी पन्नास टक्के आरक्षण लागू करून फुल्यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषित वर्गाच्या उन्नतीसाठी आरक्षणाची तरतूद करून सामाजिक न्यायाची प्रक्रिया अधिक गतिमान केली.



207

**३. शिक्षण सक्तीचे व व्यवहारोपयोगी हवे :**

महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे मानले आहे. सरकारने शिक्षणाकडे अत्यान गांभीर्याने पाहायला हवे, असे त्यांना वाटते. समाज उभारणीसाठी प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे केले जावे, अशी मागणी त्यांनी या निवेदनात केली आहे. ते म्हणतात, "माझे असे मत झाले आहे की, जनतेमधे प्राथमिक शिक्षण काही वयोमर्यादेपर्यंत सक्तीचे करावे. निदान बारा वर्षे वयोमर्यादेपर्यंत तरी ते करावे."[४] ही फुल्यांची मागणी आज दीडशे वर्षानंतरही पूर्णपणे प्रत्यक्षात येऊ शकली नाही. आजही शाळाबाह्य मुलामुलींचा प्रश्न कायम आहे. उच्च शिक्षणही सर्वांना सहजपणे घेता येईल अशी व्यवस्था असावी. त्याशिवाय समाजातील सर्व घटकांचा विकास होणे शक्य नाही, असे मत त्यांनी मांडले आहे. प्राथमिक शिक्षण जसे सक्तीचे हवे तसे ते व्यवहार उपयोगी असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी या निवेदनात नमूद केले आहे. सरकारी शाळांतून जे शिक्षण देण्यात येते ते पक्क्या पायावर उभारले पाहिजे. विद्यार्थी भावी आयुष्यात व्यवहार उपयोगी ठरले पाहिजेत. शिक्षणाची व्यवहाराशी, प्रत्यक्ष जीवनाशी सांगड घालता आली तरच ते समाज उपयोगी ठरेल असे त्यांना वाटते.

शिक्षक हा प्रशिक्षित असावा, त्याने अध्यापनाची परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी, शहरी आणि ग्रामीण भागासाठी अभ्यासक्रम वेगळा असावा, ग्रामीण अभ्यासक्रमात शेतीविषयक तंत्राची माहिती असावी, अशा अनेक सूचना या निवेदनात फुल्यांनी केल्या आहेत. एकूणच हंटर कमिशनला दिलेल्या निवेदनात महात्मा फुले यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेसंबंधी साक्षेपी विचार मांडला आहे.

शिक्षणातून समतेकडे, समतेकडून समृद्धीकडे समाज वाटचाल करू शकतो, हा विचार समोर ठेवून महात्मा फुले यांनी या भारतभूमीत जे सामजिक, शैक्षणिक कार्य केले आहे, ते अत्यंत मूलभूत स्वरूपाचे आहे. समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळाले पाहिजे आणि त्यांची सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्तता झाली पाहिजे, ह्या भूमिकेतून त्यांनी आयुष्यभर कृतीशील संघर्ष केला. हा त्यांचा संघर्ष भारतीय शिक्षण व्यवस्थेची पायाभरणी करणारा आणि एकूणच समाजाला दिशा देणारा ठरला.

संदर्भ:

१. महात्मा जोतीराव फुले – अखंडादि काव्यरचना, महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपा. य. दि. फडके, पाचवी आवृत्ती नोव्हेंबर १९९१, पृ. ५३७

२. कीर धनंजय – महात्मा फुले गौरव ग्रंथ (सं. साळुंखे पी. बी.) महात्मा फुले : शैक्षणिक तत्त्वज्ञान व कार्य, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई जुलै १९८२, पृ. १३८

३. तत्रैव – पृ. १२३

४. तत्रैव – पृ. १३९

Principal
A.V.Education Society
Degloor College Degloor

■■■



२०८